(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE-CCXXV (225)

## Domestic Violence: Impact on Indian Society




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

Guest Editor:
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 64 | महिला सबलीकरणांत स्वयंसहाय्यता बचत गटाची भूमिका<br>डॉ. स्मिता म. जाधव / डॉ.गणेश भि.मोहोड | 267 |
| 65 | विविध कालखंडात स्त्रियावरील हिंसाचाराचे बदलते स्वरूप–एक चिंतन<br>फकिरा भगवान राजगुरू | 271 |
| 66 | आर्थिक तणाव आणि देशांतर्गत कलह श्री. अदित्य प्रकाशराव कणेर | 277 |
| 67 | मानवी हक्क आणि कौटूंबिक हिंसाचार डॉ. विभा छ. घोडखांदे | 283 |
| 68 | घरगुती हिसांचाराचे स्वरूप, कारणे व उपाययोजना<br>प्रा.डॉ.संजय श्रीहरी कुंभारे | 288 |
| 69 | कौटुंबिक हिंसाचार आणि समाजव्यवस्था डॉ. रविंद्र आर सहारे | 293 |
| 70 | कौटूंबिक हिंसाचाराची कारणे आणि उपाययोजना प्रा. सुभाष एस. रंगारी | 297 |
| 71 | महिला हिंसाचार व प्रतिबंधक कायदे प्रा.डॉ.सतिश रामदासजी महल्ले | 302 |
| 72 | महात्मा फुल्यांच्या साहित्याची व्यापकता डॉ. माधव सोनेकर | 306 |
| 73 | महात्मा गांधीजीच्या असहकार चळवळीत विदर्भातील स्त्रियांचे योगदान<br>डॉ. बि.डी. रिधोरकर/डॉ. एन.ए. माथनकर | 314 |
| 74 | महात्मा गांधी के आर्थिक विचार प्रा. डॉ. रफिक. शेख | 319 |
| 75 | स्त्री अस्मितेचा पुरस्कार करणारी विचारसरणी : स्त्रीवाद प्रा. महेंद्र झलके | 322 |
| 76 | महिला आणि कौटुंबिक अत्याचार डॉ. मधुकर वि. नंदनवार | 327 |
| 77 | महिलासक्षमीकरण : देशाच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील परीवर्तनाची दिशा सौ. अनिता नरेंद्र बोबडे | 332 |
| 78 | महिला सबलीकरण आजही महत्त्वाचे प्रा. प्रविण अजबराव उपरे | 337 |
| 79 | मराठी साहित्यामधील घरगुती हिंसाचाराचे दर्शन डॉ.भूषण रामटेके | 341 |
| 80 | कौटुंबिक हिंसाचाराचे आर्थिक स्वरुप डॉ.लाजवंती टेंभुर्णे | 344 |
| 81 | महिलांचे अधिकार आणि व्यावहारीक स्वरूप<br>प्रा. डॉ. मंगेश अशोकराव रणदिवे | 347 |
| 82 | महिलांवरील अत्याचार व स्त्री प्रतिबंधक कायदे डॉ. मालीनी वडतकर | 352 |
| 83 | महिलांवर होणारे घरगुती हिंसाचार आणि कायदे<br>डॉ. प्रेमा लेकुरवाळे (चोपडे) | 358 |
| 84 | मानवी हक्क आणि कौटूंबिक हिंसाचार डॉ.प्रा.सौ. एस.पी. लाखे | 361 |
| 85 | स्वांतत्र्योत्तर ग्रामीण कथेतील स्त्रीचे दुय्यम स्थान<br>डॉ. कल्पना एस. बोरकर | 367 |




Scanned by CamScanner

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) –7.675,**
**Special Issue**
ISSN : 2278-9308
March 2020

# महिला आणि कौटुंबिक अत्याचार

डॉ. मधुकर वि. नंदनवार
भिवापूर महाविद्यालय भिवापूर

सारांश

प्राचीन काळापासून चालत आलेली भारतीय संस्कृतीने कित्येकाचे आघात होऊनही आपला परंपरागत वारसा जपला आहे. मानव समाजशिल प्राणी असून तो बुध्दीजिवी प्राणी आहे.तो आपले कौटुंबिक जीवन जगताना स्वत:चे अस्तित्व व आपली सामाजिक भूमिका पार पाडताना दिसतो. समाज व्यवस्थेत वावरत असताना या देशातील आपली सामाजिक रचना, त्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या रूढी,परंपरा, चालीरिती, बुरसटलेली माणसिकता यांचा विचार करताना स्त्रिया या पूर्वीपासून आजही सुरक्षित असताना दिसत नाही. महिलांवरील अत्याचार पूर्वीपासून आजही होतांना दिसत आहेत. राष्ट्रविकासात स्त्रियांचे स्थान महत्वपूर्ण असूनही स्त्रियांना उपेक्षित जीवन जगावे लागत आहे. 'महिला म्हणजे एक दासी', महिला म्हणजे 'चूल आणि मूल' अशा हिन भावनेच्या भूमिकेतून स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कित्येक वर्षे चालत होता. वर्षानूवर्षापासून स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी दुय्यम स्वरुपाची आहे. महिला किंवा स्त्री एक भोगवस्तू आहे तिला पुरुषापेक्षा दुय्यम स्थान आहे म्हणून समाजव्यवस्थेने तिच्याकडे आजतागायत बघितले असल्यामुळे स्त्रियांवरील अत्याचार होत आहेत. याला कारणीभूत समाजव्यवस्था व शासनव्यवस्था आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये. १९५०–७० च्या कालखंडात महिलांकडे केवळ मदतकार्य या भावनेतून विविध संघटनेकडून व शासकीय यंत्रणेकडून महिलांकरिता कार्यक्रम आखले जायचे. स्त्री ही केवळ एक माता व पत्नी हाच स्त्रियांचा दर्जा होता. भारतीय समाज व्यवस्थेमुळे भारतात स्त्रियांना नेहमीच गौण स्थान देण्यात आले होते. इतिहासाचा आढावा घेतल्यास वैदिक काळात काही अपवाद सोडल्यास सर्वच काळात स्त्रियांची मानहानी व स्त्रियांवर अत्याचार झाल्याचे दिसूनयेते. आजच्या आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या काळातही स्त्रियांवरील अन्याय व अत्याचार कमी झालेले दिसत नाही.त्या अनुसंगाने या लेखात घेतलेला आढावा.

**प्रस्तावना:**—महिलांवरील अत्याचाराचा विचार केल्यास असे दिसते की, पुरुष वर्गाची मानसिकता व सामाजिक दडपणामुळे स्त्रियांतील आत्मविश्वास क्षीण करुन तिला गुलाम ठेवण्याचे प्रयत्न केले जातात. हीच भावना लक्ष्यात घेऊन १९७५हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषीत केले. तेव्हापासून १९७५ ते १९८५ च्या दशकात सर्वप्रथम स्त्रियांना केंद्रस्थानी ठेऊन महिलांचा एक व्यक्ती वसमाजाचा घटक म्हणून जगात विचार सुरु झाला. पुढे ८ मार्च हा 'जागतिक महिला दिन' साजरा करण्याचे सर्वमान्य होत गेले. इथेच प्रयत्नांना पूर्णविराम न देता केंद्र व राज्यसरकारने स्त्री सबलीकरणासाठी प्रभावीपणे पाऊल उचललेले दिसून येते. असे असले तरी महिलांवरील अत्याचार रोखण्यात पूर्णपणे यश आलेले दिसून येत नाही.

**राष्ट्रीय समस्या:**—महिलांवरील अत्याचार ही आजच्या काळाची जागतीक समस्या झालेली दिसते. जगभरातील महिलांचा सामाजिक दर्जा हा पुरुषापेक्षा कमी आहे.''समाजात असलेले व्यक्तिचे स्थान म्हणजे त्या व्यक्तिचा समाजातील दर्जा होय''[१] असे मानव शास्त्रज्ञडॉ. राल्फ लिंटन म्हणतो ते योग्य वाटते. भारतात सकूण लोकसंख्येच्या पन्नास टक्के स्त्रिया आहेत. भारताचे संविधानमूलभूत हक्काच्या दृष्टिनेस्त्री पुरुष समानता मान्य करते परंतु प्रत्यक्षात स्थिती पाहिल्यास आज स्त्रीयांच्या

Scanned by CamScanner

समस्या व त्याच्यावरील अत्याचार या बाबतीत कमी होण्याऐवजी वाढत असल्याचे चित्र पाहावयास मिळते.

सामाजिक विषमता ही जात धर्मआणि लिंग या तीन घटकावर आधारित आहे. भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असून या संस्कृतीत स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळत आले आहे. स्त्री ही केवळ उपभेगाची वस्तु आहे अशी पारंपरिक व प्रतिगामी मानसिकता बनली आहे. स्त्रियांना शिक्षण, सत्ता, संपपतीचे सारे अधिकार पुरुष वर्गाने पूर्वीपासून नाकारले हाते. या संस्कृतीने धार्मिक कायदयाचाआधार घेऊन स्त्रीयांवर बंधने लादली असल्याचे स्पष्टपणे दिसते. सतीप्रथा, बालविवाह, हुंडाप्रथा अशा अनेक अन्यायकारक चालीरिती परंपरेने चालत आल्या आहेत.

आज महिलांवरील अत्याचार ही समाजव्यवस्थेतील व राष्ट्राची गंभीर समस्या बनलेली दिसते. २१व्या शतकातील १९ वर्षसंपत आलेली असतानाही महिलांवरील अत्याचाराच्या परिस्थितीत बदल झालेला दिसत नाही. आणि पुरोगामित्वाचा डांगोरा पिटविणारे आम्ही आमच्यात सुधारायला तयार नाहीत. 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' अशी म्हण सर्वश्रुत असताना आईची महती गायली जाते. आपल्यापैकी प्रत्येकाला आई आहे, बहीण आहे, मावशी आहे, आत्या आहे, पत्नी आहे, मुलगी आहे त्यामुळे वाईट प्रसंग वा अत्याचार आपल्याही आईबहीणीवर ओढवू शकतो याची जाणीव असूनही आपल्यापैकी अनेक लोक महिलांवर अत्याचार करतात ही अतिशय किळसवाणी व लाजीरवाणी बाब आहे. स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पाहण्याची आमची दृष्टीच माताभगीनींच्या, स्त्रियांविरूध्दच्या अत्याचारास कारणीभूत असल्याचे निदर्शनास येते.

**अत्याचाराची स्थानेः**—आपल्याकडे फक्त कुटुंबामध्येच महिला व मुलींवर अत्याचार होतात असे नाही तर रस्त्यावर, चौकात, सार्वजनिक स्थळी, प्रवासात, वाहनात इत्यादी ठिकाणी महिलांची छेड काढली जाते. त्यांच्याकडे बघुन विक्षिप्त व अश्लिल हावभाव केले जातात. मुलींना वेगवेगळया प्रकारेत्रास दिला जातो, विनयभंग केला जातो, अनेकदा तर सार्वजनीक ठिकाणी महिलांनी जाऊ नये असा विचार केला जातो. जेव्हा समाज व्यवस्थेत अशा घटना घडतात तेव्हा फक्त पीडीत महिला व मुलींनीच त्याचा प्रतिकार करावा असे नव्हे तर अशा घटना किंवा प्रसंग व दृश्य बघणाऱ्या प्रत्येकाने अशा किळसवाण्या व घृणीत कृत्यांना हाणून पाडणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारीआहे असे प्रत्येकाने आपल्या अंतःकरणातून जाणले पाहीजे. अशा घृणीत कृत्यांचा व घटनांचा समाजाने सामूहिक प्रतिकार केला तरच असे महिलांवरील अत्याचाराचे प्रकार हळूहळू कमी होती यात शंका नाही.

महिलांवरील होत आलेल्या अत्याचारात वाढ होतांना दिसते. अत्याचाराची समस्या दिवंसेदिवस उग्र रुप धारण करताना दिसत आहे. अत्याचार हा कौटुंबिक, शारीरिक, मानसिक व आर्थिक अशा स्वरुपाचा होत असतो.

**कौटुंबिक अत्याचारः**—आपल्या देशातील समाज व्यवस्थेत फार पूर्वीपासून महिलांवर अत्याचार झालेले दिसून येतात. पुराण कथेतून अनेक स्त्रियांवर अत्याचार झाल्याचे अनेक उदाहरणे रामायण, महाभारतातून दिसतात. कौटुंबिक अत्याचारात शारीरिक,शाब्दिक, लैंगिक, मानसिक व आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलांना अपमाणीत करणे, तिला शिवीगाळ करणे, अपत्य नसल्यामुळे हिनविणे किंवा तिला धमकावणे, त्रास देणे,मारझोड करुन दुखापत करणे, जखमी करणे, स्त्रीचा आर्थिक छळ करणे,महिलेच स्वतःचे उत्पन्न, स्त्रीधन,मालमत्ता व इतर आर्थिक व्यवहारापासून व तिच्या हक्कापासून स्त्रीला वंचित करणे, तिला घराबाहेर काढणे प्रसंगी घरातून हाकलून देणे या सर्व बाबींचा महिलांच्या कौटुंबिक अत्याचारात सामान्यपणे समावेश होतो.



Scanned by CamScanner

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

समाजिक जीवनात कौटुंबिक अत्याचारात पुढील प्रकारच्या अत्याचाराचा समावेश होत असतो.

**शारीरिक छळः—** समाजातील स्त्रियांवर शारीरिक अत्याचार होत असतांना कुटुंबातील स्त्रियांनाही विविध प्रकारे शारीरिकछळाला बळी पडावे लागते किंवा त्याना छळले जाते. स्त्रियांना मारहाण करणे, तोंडात मारणे, दंश करणे (चावणे) गुद्दे मारणे, ढकलणे, जोराचा धक्का मारणे(लोटणे) इतर पध्दतीने शारीरिक दुःखापत करणे, वेदना देणे, केशवपन करणे, शरीराला चटके देणे, शरिरावर डाग देणे इत्यादी बाबींचा शारीरिक अत्याचारात समावेश होतो. अशा प्रकारच्या अत्याचाराला स्त्रीला आपल्या जीवनात प्रसंगी सामोरे जावे लागते व बळी पडावे लागते.

**लैंगिक अत्याचारः—**समाजव्यवस्थेत सर्वात भयंकर प्रकार लैंगिक अत्याचाराचा आहे. या अत्याचारात जबरदस्तीने समागम करणे,(बलात्कार करणे) अश्लिल छायाचित्र काढणे, बिभत्स कृत्य बळजबरीने करावयास लावणे, अश्लिल चाळे करणे, किंवा समाजात बदनामी होईल असे अश्लिल कृत्य करणे इत्यादी कृत्ये स्त्रियांच्या लैंगिक अत्याचारात येतात. अशा अत्याचाराच्या घटना दिवसागणिक घडताना दिसतात. स्त्रियांचा काही प्रसंगी जीव जाताना दिसतो.

**मानसिक(तोंडी व भवनिक) अत्याचारः—** स्त्रिया या जन्मतःच स्वभावाने भावनिक, हळव्या व नाजूक असतात. त्यामुळे स्त्रियांना त्यांच्या चारित्र्याविषयी संशय उत्पन्न करणे, शाब्दिक अपमान करणे, वाईट नावाने बोलाविणे, मुलगा झाला नाही म्हणून अपमानीत करणे, हुंडयासाठी अपमान करुन अपशब्दात शिव्या देणे, स्त्रिला एखादया ठिकाणी नोकरी स्विकारण्यास व करण्यास जबरदस्ती करणे, इतर कामासाठी कोणत्याही व्यक्तिबरोबर भेटण्यास मज्जाव करणे, एखादया महिलेला पसंतीच्या व्यक्तिबरोबर लग्न करण्याची इच्छा असतांना दुसऱ्या नाआवडत्या पुरुषाबरोबर लग्न करण्यास जबरदस्ती करणे, आत्महत्या करण्याची धमकी देणे इत्यादी तोंडी व भावनात्मक अपशब्दाचा वापर करुन स्त्रियांवर अत्याचार केला जातो. अशा अत्याचाराला स्त्रीया जबाबदार नसताना त्यांच्यावर अत्याचार होत असतो.

**आर्थिक अत्याचारः—** समाजव्यवस्थेत स्त्रियांना आर्थिक अत्याचाराला बळी पडावे लागते. यात हुंडयाची मागणी करणे, महिलेच्या किंवा तिच्या अपत्यासाठीच्या पालनपोषणासाठी पैसे न देणे, महिलेला आवश्यकतेच्या वा तिच्या अपत्यांना आवश्यकतेच्या वेळी अन्न, वस्त्र, औषध इत्यादीसाठी पैसे न पुरविणे, नोकरी करण्यास मुभा न देणे, नोकरी स्विकारण्यास बंदी घालणे, पगारातून वा रोजगारातून आलेले पैसे काढून घेणे, राहत असलेल्या घरातून हाकलून देणे, घरात राहण्यास मनाई करणे, घरातील कपडे व नेहमीच्या वस्तू वापरावयास बंदी घलणे, महिलेच्या नावे असलेल्या घराचे भाडे महिलेला न देणे, कुटुंबातील महिलेजवळ असलेले पैसे व दागीने जबरदस्तीने मागून घेणे इत्यादी आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने महिलांवर अत्याचार होत असल्याचे दिसते.

महिलांना अशाप्रकारच्या अत्याचाराला सामोरे जावे लागते. कौटुंबिक हिंसाचाराचीकाही कारणे आहेत की त्या कारणांमुळे कौटुंबिक हिंसाचार होतो व त्याचा त्रास महिलांना होत असतो.

**कौटुंबिक हिंसाचार कारणेः—**पूर्वीच्या काळी संयुक्त कुटुंब पध्दती होती सध्याच्या युगात संयुक्त कुटुंबात महिला राहण्यास बऱ्याचदा तयार होत नाहीत. महिलांना पतीकडचे नातेवाईक नको असतात. त्यातून अनेक वाद उत्पन्न होताना दिसतात. एकत्र कुटुंबात सासूचा जाच कौटुंबिक हिंसाचारास कारणीभूत ठरत असतो.

दूरचित्रवाणी सारख्या प्रसार माध्यमांच्याव्द्रारे अनेक प्रकारच्या सासू सूनेच्या मालिका दाखविल्या जातात त्यात एकत्र कुटुंबातील एकदुसऱ्यावर कुरघोडी करण्याचा खेळ सतत दाखविला जातो. सोबतच पारंपारिक मध्ययुगीन मूल्यव्यवस्था रूजविण्याचा प्रयत्नही होतांना दिसून येतो.विशेषतः



Scanned by CamScanner

ISSN : 2278-9308
March 2020

स्त्रीचा जन्म होण्यापूर्वीच तिला दुय्यम दर्जाची, भेदभावाची वागणूक दिली जाते. स्त्री म्हणजे परक्याचे धन, स्त्री धर्मिक कार्यात नको असते कारण ती अपवित्र मुलगी नकोशी म्हणून भ्रूणहत्या, मानसिक वशारीरिक छळ तीचे सर्वकस शोषन, हुंडाबळी, सती अशा अनेक माध्यमातून स्त्रियांना दडपून ठेऊन त्यांना गुलामाप्रमाणे वागणूक दिल्या गेली. परंतु हे मानवी अधिकाराचे उल्लंघन आहे. कौटुंबिक हिंसाचार हा मानव अधिकाराचा विषय असून स्त्रियांचे संरक्षण व्हावे हे कायदयाने दिलेले अधिकार आहेत.

स्त्रीयांना हिंसाचारापासून संरक्षण प्रदान करणारे कायदे:–

सामाजव्यवस्थेत कुटुंबात स्त्रियावर होणाऱ्या अत्याचारापासून स्त्रीचे संरक्षण करण्यासाठी स्त्रीयांचे संरक्षण कायदा २००५ हा कायदा २६ ऑक्टोंबर रोजी प्रत्यक्ष अस्तित्वात आणण्यात आला.परंतु या कायदयाची पाहीजे त्या प्रमाणात दखल घेतल्या गेल्याचे दिसून येत नाही.सरकारी न्यायालयीन पातळीवर त्याचप्रमाणे संपूर्ण समाजात या कायदयाची उदासिनता दिसून येते. समाजव्यवस्थेत स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विविध घटना दररोज अवतीभेवती घडताना दिसतात. स्त्रियांरील अत्याचाराचे प्रमाण दिवसागणीक वाढत आहे. कौटुंबिक अत्याचार मानवी हक्काचे उल्लंघन या परीस्थितीची गंभीर दखल घेऊन भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अधिकाराची हमीप्रमाणे कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण व्हावे या हेतूने हा कायदा करण्यात आल्याचे स्पष्ट दिसते. या कायदयामुळे कुटुंबात होणाऱ्या निरनिराळया अत्याचारापासून व कौटुंबिक अत्याचारापासून तिला संरक्षण व हक्क प्राप्त करून देण्यासाठी पुढील कायदे अस्तित्वात आले आहेत–१) भारतीय दंड विधान कायदा २) घटस्पोट कायदा ३)कुटुंब न्यायालय कायदा ४)मुस्लिम महिलांसाठी संरक्षण कायदा ५)स्त्रियांचे अस्लिल प्रदर्शन विरोधी कायदा ६)सती प्रथेविरुध्द कायदा ७)गर्भलिंग परिक्षण व गर्भपात विषयक कायदा इत्यादी कायदयाच्या आधारे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण होत असते.

हिंसामुक्त जीवन वअत्याचारमुक्त जीवन हा स्त्रीचा मानवी हक्क आहे. या कायदयाव्द्वारे पिडीत महिलेला न्याय व संरक्षण मिळू शकते, या कायदयाअंतर्गत पिडीत महिलेबरोबर तिची काही वर्षाखालील मुले व दत्तक घेतलेली मुले यांनाही संरक्षण मिळते. स्त्रीधन, दागदागीने, कपडे इत्यादीवर ताबा मिळतो, स्त्री ज्या घरात राहते ते घर तिला सोडावे लागत नाही. वैद्यकीय उपचाराचा खर्च स्त्री मागू शकते तसेच शारीरिक व भावनिक हिंसाचाराबध्दल नूकसान भरपायी मागू शकते. भरतीय दंड संहिता 'अ'कलमाखाली पोलीसात तक्रार दाखल करता येते. या कायदयाअंतर्गत छळ होत असलेलीकिंवा झालेली स्त्री संरक्षण अधिकाऱ्याकडे, सेवा पुरविणाऱ्या संस्थेकडे तसेच पोलीस स्टेशन किंवा दंडाधिकाऱ्याकडे तोंडी किंवा लेखी तक्रार करू शकते. या कायदयाअंतर्गत कौटुंबिक अत्याचाराने पिडीत पत्नी, सासू,बहीन, मुलगी, अविवाहित स्त्री, विधवा,आई इत्यादी म्हणजे लग्न, रक्ताचे नाते, लग्न सदृश्य संबंध दत्तक विधीअशाकारणाने नाते संबंध असणाऱ्या व कुठल्याही जाती धर्माच्या स्त्रियातसेच त्यांची १८ वर्षाखालील मुले दाद मागू शकतात. पिडीत महिला तिच्या अथवा तिच्या मुलाविरुध्द होणारे अत्याचार थांबवू शकते असे स्त्री संरक्षणाचे कायदे अमलात आले आहेत.

समारोप:– कौटुंबिक हिंसाचार कायदयाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाने संरक्षण अधिकारी व सेवा देणाऱ्या संस्थांची नियुक्ती केली आहे. तरीही महिलांवरील अत्याचार व छळ कमी झालेले दिसत नाही.हुंडा प्रतिबंधक कायदा(१९२९), कौटुंबिक हिंसाचार कायदा(२००५) अस्तित्वात आल्यानंतरही स्त्री अत्याचाराच्या घटना घडतच आहेत. कुठे बलत्काराच्या घटना, कुठे सुनेला जाळून मारने, महिलांच्या आत्महत्यांच्या घटना, सुनेप्या छळाच्या घटना, शैक्षणिक केंद्रात मुलींचा लैंगिक छळ, सार्वजनिक ठिकाणी स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, कार्यक्षेत्रामध्ये ती



Scanned by CamScanner

ISSN : 2278-9308
March 2020

अकार्यक्षम म्हणून तिच्याकडे पाहण्याचा कल, कौटुंबिक पातळीवर तिची होणारी मानहानी, कामाच्या ठिकाणी तिचा होणराछळ, तिचा होणारा शरीरिक, मानसिकछळ, शाब्दिक, भावनिक, आर्थिक छळ पाहता जवळजवळ ७० टक्के महिलांना घरघुती अत्याचाराला सामोरे जावे लागते. हुंडाबळीच्या घटना व स्त्रियांना घरात व रस्त्यावर जिवंत जाळण्याच्या क्रूर व निर्दयी घटना डोके वर काढत आहेत.सरकारने वेगवेगळया छळाविषयी समित्या नेमल्या, कायदे केले, बलात्कार प्रतिबंधक कायदा स्थापन केला. अनेक कायदे केले. पण त्या कायदयामध्ये विशाखा गाईडलाईन्स कायदा पुरेसा कडक व सर्वसमावेशक असल्याचे दिसते. असे असले तरी आज स्त्रियांनी स्वावलंबी होणे आवश्यक आहे. त्यासाठी कौटुंबिक स्तरावरही प्रयत्न व प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. महिलावरील अत्याचाराच्या घटना या आजच्या घडीला दिवसागणीक घडताना दिसतात. त्या रोखण्यासाठी महिलांनी प्रथम स्वतः खंबीर होण्याची खरी गरज आहे. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणे, तिचा मानसिक छळ करणे,मारहान करणे,घटस्फोटाच्या नोटिसा पाठवून हैराण करणे इत्यादी घटना तिच्या मानसिक खच्चीकरणासाठी कारणीभूत ठरतात. यातूनच मग या समाजात पुढे न येता मग स्त्रिया या आत्महत्येचा मार्ग निवडतांना दिसतात. कायदयाच्या कचाटयातून सुटण्यासाठी तसेच कौटुंबिक त्रास कायमचा संपविण्यासाठी स्वत:लाच संपविण्याचा निर्णय घेतात. सासरच्या छळाला कंटाळून घेतले जाणारे जाणारे निर्णय हे त्या स्त्रीच्या जीवावर बेतणारे ठरतात व अशावेळी कायदाही हतबल ठरल्याचे दिसते. अखेरीस महिलांवरील अत्याचार रोखता येणे शक्य आहे का? या प्रश्नाचे उत्तर खरोखरच अनुत्तरीत करणारे असले तरी आपण होकारार्थी दृष्टिकोणातून पाहिले पाहीजे, त्यासाठी स्त्रीने न घाबरता पुढे येणे आजच्या काळाची खरी गरज आहे. सोबत आपण सर्वानी मिळून स्त्री शक्तीला मदत करणे, तिच्या पाठीशी खंबीरपणे ऊभे राहिलो पाहिजे. शासनाने अत्यंत कडक असे कायदे करणे गरजेचे आहे तरच स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराला आळा बसेल असे वाटते.

संदर्भ ग्रंथः–

१) मेहेत्रे, डॉ. स्मीता, 'भारतीय स्त्री व मानवाधिकार' साईनाथ प्रकाशन नागपूर–२०११
२) डॉ. अलका देशमुख, 'विविध आयामातून स्त्री' साईनाथ प्रकाशन नागपूर–२०११
३) योजना मासिक, मे.२००७
४) प्रसाद,निता–संपादक–(२०११) महाराष्ट्रातील महिलांचे सबलीकरण कायदे–एक विश्लेशण. Darj-Vol-3No_3,Oct-Dec.-2011



Scanned by CamScanner